फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ९१/२०२२ मधील निशाणी क्र. ५ खालील आदेश
**CNR No.MHPU170021512022.**

सुमैय्या निहाल शेख व इतर वि. निहाल कमरुद्दीन शेख.

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ नुसार गैरअर्जदार याच्याकडुन अर्जदार यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु. १०,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथने व अर्जदार यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद असा की, अर्जदार क्र.१ हिचे लग्न गैरअर्जदार याचेसोबत दिनांक २२.११.२०२० रोजी झाले. लग्नानंतर, गैरअर्जदाराने चार चाकी गाडी घेण्यासाठी रक्कम रुपये ५०,०००/- ची मागणी अर्जदार हिच्याकडे करुन व इतर घरगुती कारणांवरुन तिला मारहाण व शिवीगाळ करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. त्यामुळे, अर्जदार हिने गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबियांविरुध्द इंदापूर पोलीस स्टेशनला दिनांक ३०/०५/२०२२ रोजी, गु.र.नं.३६६/२०२२ नुसार फिर्याद दिली. आजरोजी अर्जदार ही तिच्या माहेरी रहात असुन तिला स्वतःचा चरितार्थ चालविणेसाठी तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याऊलट, गैरअर्जदार हा सेक्युरिटी गार्डची नोकरी करीत असुन त्यास दरमहा ३०,०००/- ते ४०,०००/- इतका पगार मिळतो. गैरअर्जदार याच्या ०७ खोल्या भाडयाने दिलेल्या असुन त्यापासुन प्रत्येकी दरमहा २,०००/- व जिओ कंपनीचे टॉवर चे भाडे दरमहा ७,०००/- एवढे उत्पन्न त्यास मिळते, म्हणुन अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. गैरअर्जदार याने त्याचे म्हणणे निशाणी क्र. १२ वर दाखल केले. त्याने अर्जदार हिचे अर्जातील मजकुर खोटा व लबाडीचा असुन तो त्यास मान्य नसल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार याचे कथन की, तो खाजगी सुरक्षा रक्षक

म्हणुन आठ हजार रुपये पगारावर काम करत आहे. तो अर्जदार हिस आजही नांदविण्यास तयार आहे. गैरअर्जदार याची आई विधवा असुन तिच्याकडे ७ लहान खोल्या असुन त्यापासुन तिला दरमहा एकुण ७०००/- रुपये भाडे व मोबाईल टॉवरचे दरमहा ४०००/- रुपये भाडे मिळते परंतु सदर रक्कमेतुन बँकेच्या कर्जाचा हप्ता, तिच्या बी.पी.च्या आजाराचा खर्च व दैनंदीन उपजिवीकेचा खर्च तिला होतो. गैरअर्जदारास फायनान्सच्या कर्जाचा हप्ता असुन त्यास उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार याचे कथन की, अर्जदार हिचा शिलाई मशीनचा व्यवसाय असुन त्यापासुन तिला दररोज रक्कम रुपये ५००/- इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिने गैरअर्जदार याचे कौटुंबिक व वैवाहिक आयुष्य उध्वस्त केले असल्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्याने केली आहे.

४. अर्जदार हिने यादी निशाणी क्र.३ सोबत तिचे आधारकार्डाची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांचे मालमत्ता व देणीबाबतची शपथपत्रे अनुक्रमे निशाणी क्र.१५ व १६ वर दाखल केलेली आहेत.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखावर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले तसेच दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला असता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात, त्यावर कारणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार हिने सिध्द केले आहे काय की, ती व अर्जदार क्र.२ हे मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार याच्याकडुन अंतरिम पोटगी म्हणुन दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/- मिळण्यास पात्र आहे? असल्यास किती? | अंशतः होकारार्थी.<br><br>अर्जदार हे गैरअर्जदार याच्याकडुन दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. |
| २) | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

मुद्दा क्रमांक १ करीता -

६. अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणण्यांचा एकत्रीत विचार करता, अर्जदार व गैरअर्जदार हे पती-पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही त्यांची मुलगी आहे, या बाबी वादातीत नसल्याचे दिसुन येते. अर्जदार हिने शपथेवरती कथन केले आहे की, गैरअर्जदार याने अर्जदार हिच्याकडे माहेरहुन चार चाकी गाडी घेवुन ये म्हणुन रक्कम रुपये ५०,०००/- ची मागणी करुन तिला शिवीगाळ व मारहाण करुन नांदवण्यास नकार दिला. याऊलट, गैरअर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, अर्जदार हिच्या अर्जातील कथने खोटी असुन तिने त्याचे कौटुंबिक व वैवाहिक आयुष्य उध्वस्त केले आहे.

७. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या म्हणण्यांचा एकत्रीत विचार करता, आजरोजी अर्जदार ही तिच्या माहेरी रहात असल्याचे दिसुन येते. तथापि, अर्जदार ही तिच्या माहेरी रहात असल्यापासुन, गैरअर्जदार याने अर्जदार यांच्या पालनपोषणाची काहीएक तजवीज केली किंवा कसे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. गैरअर्जदार हा अर्जदार हिचा पती असल्याने अर्जदार यांचा सांभाळ व पालन-पोषण करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी त्याचेवरती आहे. परंतु, गैरअर्जदार याने त्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी पार पाडल्याचे दिसुन येत नाही.

८. अर्जदार हिचे कथन की, गैरअर्जदार हा सेक्युरिटी गार्डची नोकरी करीत असुन त्यास दरमहा ३०,०००/- ते ४०,०००/- इतके उत्पन्न मिळते. जाबदेणार याच्या ०७ खोल्या भाडयाने दिलेल्या असुन त्यापासुन प्रत्येकी दरमहा २,०००/- व जिओ कंपनीचे टॉवर चे भाडे दरमहा ७,०००/- एवढे मिळते. याऊलट, गैरअर्जदाराचे कथन की, तो खाजगी सुरक्षा रक्षक म्हणुन आठ हजार रुपये पगारावर काम करत आहे. त्याची आई विधवा असुन तिच्याकडे ७ लहान

खोल्या असुन त्यापासुन तिला दरमहा एकुण ७०००/- रुपये भाडे व मोबाईल टॉवरचे दरमहा ४०००/- रुपये भाडे मिळते परंतु सदर रक्कमेतुन बँकेच्या कर्जाचा हप्ता, तिच्या बी.पी.च्या आजाराचा खर्च व दैनंदीन उपजिवीकेचा खर्च तिला होतो. गैरअर्जदारास फायनान्सच्या कर्जाचा हप्ता असुन त्यास उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही.

९. अर्जदार हिने गैरअर्जदार यास ३०,०००/- ते ४०,०००/- दरमहा पगार मिळत असल्याबाबत व तसेच ०७ खोल्यांचे रक्कम रुपये २,०००/- प्रत्येकी प्रमाणे व मोबाईल टॉवरचे ७०००/- रुपये प्रमाणे दरमहा भाडे गैरअर्जदार यास मिळत असल्याबाबत अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच, अर्जदार हिचा शिलाई मशीनचा व्यवसाय असुन तिला दररोज रक्कम रुपये ५००/- प्रमाणे उत्पन्न मिळत असल्याबाबत अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांची कथने पुराव्याअंती शाबीत होणार असुन आजरोजी प्रस्तुतचा अर्ज हा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे.

१०. अर्जदार हिच्या शपथेवरील कथनांवरुन, तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, असे दिसुन येते. गैरअर्जदार याने त्याचे लेखी म्हणणे निशाणी क्र.१२ व त्याचे मालमत्ता व देणीबाबतचे शपथपत्र निशाणी क्र.१६ खाली तो सुरक्षा रक्षक म्हणुन ८,०००/- रुपये पगारावर काम करीत असल्याबाबत नमुद केलेले आहे. त्यामुळे, गैरअर्जदार हा नोकरी करीत असल्याचे दिसुन येते.

११. वर नमुद गोष्टींचा एकत्रीत विचार करता, गैरअर्जदार याने अर्जदार यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन, मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्याचा आदेश होणे न्यायोचीत वाटते, म्हणुन मुद्दा क्र. १ करीता, अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवीत आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ करीता -</u>

१२. मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष विचारात घेता, अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार याने अर्जदार यांना, दरमहा प्रत्येकी रक्कम रु. १,०००/- (एक हजार रुपये मात्र) प्रमाणे अंतरिम पोटगी, प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

३) सदर आदेशाची प्रत अर्जदार हिस विनामुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRAKASH LALASAHEB PATIL
Date: 2023.09.29 15:42:52 +0530

इंदापूर. ( पी. एल. पाटील )
दिनांक –२९.०९.२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

**प्र मा ण प त्र**

" मी, याद्वारे, असे प्रमाणित करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ.फाईलच्या आदेशातील मजकुर हा तिच्या मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दांनुसार समान आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | र. सि. पारवे,<br>लघुलेखक निम्नश्रेणी -३. |
| न्यायालयाचे नांव व पदनाम | - | पी.एल.पाटील,<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| आदेशाची तारीख | - | २९/०९/२०२३. |
| आदेश न्यायिक अधिकारी यांनी स्वाक्षरित केल्याची तारीख | - | २९/०९/२०२३. |
| आदेश सी.आय.एस.प्रणाली मध्ये अपलोड केल्याची तारीख | - | ३०/०९/२०२३. |